2 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करा'

**म. टा. वृत्तसेवा, कसबा बावडा**

'डॉक्टर हा समाजातील महत्वाचा घटक आहे. त्यांनी ज्ञानाचा उपयोग समाजोपयोगी कार्यासाठी करण्याची गरज आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठाचा बारावा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात झाला. या वर्धापन दिनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमात सद्गगुरु गुरुनाथ मुंगळे यांना डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्काराने डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. डॉ. विनय वाघ यांना डी. वाय. पाटील आदर्श शिक्षक आणि एस. आर. पाटील यांना शांतादेवी पाटील आदर्श सेवक पुरस्काराने गौरविण्यात आले.

प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'डी. वाय. पाटील विद्यापीठाने १२ वर्षे यशस्वी वाटचाल करताना गेल्या दशकात कुशल, ज्ञानी डॉक्टर घडवले आहेत. वैद्यकीय व्यवसायाला जगभरात महत्व आहे. समाजातही डॉक्टरांना महत्वपूर्ण असे स्थान आहे. डॉक्टराचा प्रवास हा व्यक्तीच्या जन्मापासून ते शेवटपर्यंत असतो. वैद्यकीय व्यवसायात डॉक्टरांना रोज नवीन ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे डॉक्टरांनी आपल्या प्राप्त ज्ञानाचा वापर समाजोपयोगी कार्यासाठी करावा.'

यावेळी जीवनगौरव पुरस्काराबद्दल सदगुरु गुरुनाथ मुंगळे, आदर्श शिक्षक डॉ. विनय वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. प्रकाश बेहरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी आदर्श, गुणवंत विद्यार्थी, खेळाडूंचा गौरव करण्यात आला. अधिष्ठाता डॉ आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले आदी उपस्थित होते.

राहुल मगदूम




**डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्काराने गुरुनाथ मुंगळे यांना सन्मानित करताना डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय पाटील. शेजारी शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विश्वस्त ऋतुराज पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश बेहरे, अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले आदी.**

2 SEP 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डी. टी. शिर्के : डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा १२ वा वर्धापन दिन

# डी. वाय. पाटील विद्यापीठ लौकिकास पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनासाठी डी. वाय. पाटील विद्यापीठाने वैद्यकीय शिक्षण संस्थांशी सामंजस्य करार केलेले आहेत. त्याचा लाभ वैद्यकीय क्षेत्राला होत आहे. त्यामुळे हे विद्यापीठ नावलौकिकास पात्र ठरत आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.



डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या १२व्या वर्धापन दिनी सद्गुरु गुरुनाथ मुंगळे यांना डी. वाय. पाटील जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करताना डॉ. संजय डी. पाटील. यावेळी डॉ. प्रकाश बेहेरे, ऋतुराज पाटील, प्रा. डी. टी. शिर्के, डॉ. विश्वनाथ भोसले, डॉ. आर. के. शर्मा उपस्थित होते.

येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा १२ वा वर्धापन दिन शुक्रवारी संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, कुलगुरु डॉ. प्रकाश बेहेरे, विश्वस्त ऋतुराज पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सद्गुरु गुरुनाथ मुंगळे यांना डी. वाय. पाटील जीवन गौरव पुरस्कार, तर डॉ. विनय वाघ यांना डॉ. डी. वाय. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच सदाशिवराव पाटील यांना शांताबाई डी. पाटील आदर्श सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्र-कुलगुरु शिर्के म्हणाले, वैद्यक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने सामाजिक बांधिलकी म्हणून आपल्या व्यवसायाकडे पाहिले. या क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. त्याच्याशी प्रत्येकाने अवगत झाले पाहिजे.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश बेहेरे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. संस्थाध्यक्ष डॉ. संजय डी पाटील यांनी पुरस्कार प्राप्त गौरवमूर्तींची नावे जाहीर केली. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा यांनी स्वागत केले. यावेळी कुलसचिव विश्वनाथ भोसले, वित्त अधिकारी श्याम कोले, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. जे. एफ. पाटील, प्रमोद धरणगुत्ती, डॉ. डी. आर. बेलेकर, डॉ. ए. एस. गुप्ता, डॉ. ए. एन. जाधव, डॉ. एस. आर. पावसकर, प्रा. महादेव नरके, प्रा. जे. ए. खोत, बाबा सावंत, बाबासो पाटील-भुयेकर, निवृत्त ब्रिगेडियर यु. डी. थोरात, अशोक देसाई, संजय जाधव उपस्थित होते.

- 2 SEP 2017 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात मधुमेहविषयक औषध संशोधन अंतिम टप्प्यात

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवाजी विद्यापीठात** गेल्या पंधरा वर्षांपासून सुरू असलेल्या मधुमेहविषयक संशोधनातून उपयुक्त आयुर्वेदिक औषध निर्माण करण्यात यश आले आहे. आता अंतिम टप्प्यातील मानवी चाचण्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने येथील डॉ. डी.वाय. पाटील हॉस्पिटलशी सामंजस्य करार केला असल्याची माहिती सोमवारी देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रुसा) अंतर्गत सुमारे ३५ लाख रुपयांचा महा-संशोधन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. डायबिटीस- डेव्हलपमेंट ऑफ न्यूट्रास्युटिकल प्रोडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ प्रोग्रेशन ऑफ प्रि-डायबिटीस टू डायबिटीस मेलिटसङ असे या प्रकल्पाचे नाव आहे.

डॉ. अरविंदेकर यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांचा गट गेल्या १५ वर्षांपासून मधुमेहासंदर्भात आयुर्वेदिक उपचार पद्धती शोधण्यासाठी संशोधन करीत आहे. त्यासाठी त्यांना येथील आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. विवेक हळदवणेकर यांचेही सहकार्य लाभत आहे. या संशोधनांतर्गत गेल्या तीन वर्षांपासून मधुमेहाची सुरवात नेमकी कशामुळे होते, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यातून संशोधित करण्यात आलेल्या औषधाची विविध मान्यताप्राप्त प्रयोगशाळांत तसेच प्राण्यांवरही यशस्वी चाचण्या करण्यात आल्या आहेत. आता मानवी चाचण्यांसाठी डॉ. डी.वाय. पाटील हॉस्पिटलसमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या प्रस्तावाला हॉस्पिटलच्या नोंदणीकृत नैतिक समितीची मान्यताही प्राप्त झाली आहे.या कराराअंतर्गत करण्यात येणाऱ्या चाचण्यांना रुसा (महाराष्ट्र) यांचे सहकार्य असेल. या अंतर्गत मधुमेहग्रस्त, मधुमेह-पूर्व तसेच नियंत्रित अशा तीनही प्रकारच्या सुमारे शंभर रुग्णांवर चाचण्या घेण्यात येणार असून त्यांच्यावरील औषधाच्या परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या प्रकल्पावर प्रा. शिम्पा शर्मा या सह-प्रधान संशोधक म्हणून तर डॉ. अरविंद गुलबके आणि डॉ. वेणुगोपाल हे सह-प्रकल्प संशोधक म्हणून काम करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 SEP 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ निवडणुकांचा कार्यक्रम दोन दिवसांत जाहीर

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठांच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा कार्यक्रम दोन दिवसांत जाहीर केला जाणार आहे. याबाबत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. ऑक्टोबरच्या अखेरीस सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. त्यामुळे आता नव्या विद्यापीठ कायद्यानुसार या निवडणुका घेण्यासाठी प्रक्रिया राबवली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

## पदवी प्रमाणपत्रास विद्यापीठाची मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची मुदत ७ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पडणारा मुसळधार पाऊस, यामुळे इंटरनेट व्यवस्थेत झालेला बिघाड तसेच सलग आलेल्या सार्वजनिक सुट्टया यांचा विचार करता नियमित शुल्क २५० रुपयांप्रमाणे पदवी प्रमाणपत्रांकरिता अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. २५० रूपये नियमित शुल्काप्रमाणे पदवी प्रमाणपत्रांकरिता वाढीव मुदतीत अर्ज करावा असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'एनएसएसमुळे नेतृत्व विकास'

कोल्हापूर : 'एनएसएस'च्या माध्यमातून बंधूभाव जपला जातो. या उपक्रमामुळे सभाधीटपणा, नेतृत्वाचे गुणांचा विकास, कार्यक्रमाचे आयोजन संयोजन कसे करावे आदी गुणांचा विकास होतो,' असे मत स. ब. खाडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ आणि राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज यांच्या संयुक्तकरणाने शाहू कॉलेज येथे ५ सप्टेंबरअखेर 'शाश्वत विकास' या मध्यवर्ती संकल्पनेवर विद्यापीठस्तरीय विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी डॉ. गायकवाड यांनी एनएसएस शिबिरात आपलेपणा निर्माण होतो. एनएसएस हे जगायला शिकवते. सकारात्मक भाव जपण्याबरोबरच सतत गतिमान काम करण्यासाठी एनएसएस प्रोत्साहन देत असते, असे सांगितले.

शिबिराचा समारोप ५ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे असतील. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे असतील.